# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

**फोन नं.(०२०) २६०५०६४१/२६०५१११०** **ई-मेल आयडी** :-sceapune@gmail.com


जा.क्र.रासनिप्रा/नि.ख.वि.मर्या./मार्गदर्शक सुचना / ९६८८ /सन २०२० दिनांक : १६/०६/२०२०

**वाचावे** : -

१. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ दि.११.०९.२०१४
२. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) (प्रथम सुधारणा ) नियम २०१८ दि.०६.०८.२०१८
३. प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र.रासनिप्रा /परिश्रमिक/ भत्ते/७७५/२०१४, दिनांक १७.११.२०१४
४. प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र.रासनिप्रा/अ-बवर्ग/नि.निधी/परिश्रमिक भत्ते/१०१५/२०१४, दिनांक ०९.१२.२०१४
५. प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र.रासनिप्रा/ क वर्ग सह.सं/परिश्रमिक/ शुध्दीपत्रक/१०४२/२०१४, दिनांक ११.१२.२०१४
६. प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र.रासनिप्रा/अ-ब वर्ग/नि.निधी/परिश्रमिकभत्ते/४७७४/२०१५, दिनांक २८.०५.२०१५
७. प्राधिकरणाकडील परिपत्रक जा.क्र.रासनिप्रा/परिपत्रक/निवडणूक खर्च/७१०३/२०१५, दिनांक ३१.०७.२०१५
८. प्राधिकारणाकडील शुध्दीपत्रक जा.क्र.रासनिप्रा/अंदाजित निवडणूक खर्च/मान्यता/४५६५/२०१६ दिनांक ०४.०८.२०१६
९. प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र.रासनिप्रा/नि.ख.वि.मर्या/मार्ग.सुचना/६७७५/२०१६ दि.१६.११.२०१६
१०. प्राधिकारणाकडील शुध्दीपत्रक जा.क्र.रासनिप्रा/कक्ष -५/अभि धा.क्र.२०/इतर नि.नि.अ./मानधन/७७८७/२०१६ दि.२०.१२.२०१६
११. प्राधिकारणाकडील शुध्दीपत्रक जा.क्र.रासनिप्रा/नि.ख.वि.मर्या/मार्ग.सुचना/शुध्दीपत्रक/१०४५/२०१८ दि.१२.०२.२०१८
१२. प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र.रासनिप्रा/खर्च मर्यादा/जि/ता.स.नि.अ./१९०४/२०१८ दि.१६.०३.२०१८
१३. प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-११/निवडणूक/सामग्री/स्टेशनरी/पुन:वापर/१५४४/२०२० दि.१३.०५.२०२०

**प्रस्तावना** :-

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१) नुसार राज्यातील सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्यासाठी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण गठीत करण्यात आले असून प्राधिकरणास उक्त नमूद कलमान्वये राज्यातील सहकारी संस्थांच्या संचालक मंडळांच्या निवडणूका, नैमित्तिक रिक्त जागा व पदाधिकारी इ. च्या निवडणूका घेण्याचे अधिकार प्राप्त आहेत. आणि,

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ मधील नियम ३ (vi) व उक्त अधिनियमातील कलम ७३ कब (१३) नुसार प्राप्त अधिकारांचा वापर करुन, सहकारी संस्थांच्या निवडणूक खर्चात सुसुत्रता आणणे, खर्चाच्या दरात समानता ठेवणे, अनावश्यक किंवा अनाठायी खर्च कमी करुन निवडणूक खर्च कमी ठेवणे करीता प्राधिकरणाने संदर्भिय क्र.३ ते १२ चे आदेश / परिपत्रकान्वये 'अ', 'ब', 'क' व 'ड' या सर्व प्रकारातील संस्थांच्या निवडणूकांसाठी आवश्यक निवडणूक निधी व मानधन / परिश्रामिक भत्ते निर्धारीत केलेले आहेत. आणि,

ज्याअर्थी, संदर्भ क्र.२ अन्वये महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) (प्रथम सुधारणा ) नियम २०१८ दि.०६/०८/२०१८ अन्वये सुधारीत निवडणूक नियम प्रसिध्द केले आहेत. त्यानुसार सहकारी संस्थाच्या वर्गवारीत तसेच निवडणूक नियमातील काही तरतुदींतही बदल झालेले आहेत. आणि

ज्याअर्थी, सहकारी संस्थांचा निवडणूक खर्च किमान मर्यादेत ठेवणे हे प्राधिकरणाचे धोरण आहे. त्यानुसार प्राधिकरणाने यापुर्वी वेळोवेळी निवडणूक खर्चात काटकसर करुन, खर्च मर्यादीत ठेवणेची बाब प्राधिकरणाचे धोरणात प्रकर्षाने नमूद केलेली आहे. तथापी निवडणूक नियमातील सुधारीत तरतुदींच्या अनुषंगाने निवडणूक प्रक्रीयेतील सर्व खर्चात सुसुत्रता आणण्यासाठी, सुधारीत धोरण निर्धारीत करणे आवश्यक झाले आहे. संस्थेची सभासद संख्या ही निवडणुक प्रक्रीयेमध्ये होणाऱ्या खर्चावर मोठया प्रमाणात प्रभाव पाडत असल्याची बाब विचाराधिन घेऊन त्यानुषंगाने निवडणूक खर्चाबाबत सुधारीत मर्यादा निश्चित करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, प्राधिकरणाने सदर्भिय क्र. ३ ते १२ अन्वये वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश, परिपत्रके, सुचना अधिक्रमित करुन सहकारी संस्थांचा संपुर्ण खर्च नियंत्रीत व मर्यादीत रहावा म्हणून बाब निहाय मार्गदर्शक सुचना विहित करण्याची कार्यपद्धती निश्चित करण्यात येत आहे. सदर कार्यपध्दतीनुसार खर्च करताना प्राधिकरणाने ठरवून दिलेल्या कमाल मर्यादेच्या अधिन राहून जिल्हा / तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी / निवडणूक निर्णय आधिकारी यांनी निवडणूक निधीमधुन खर्च करणेबाबत खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

## -: आदेश :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१३) व महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ३ (v), (vi) नुसार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण प्राप्त अधिकारांचा वापर करुन वाचावे क्र.२ अन्वये प्रसिद्ध झालेल्या सुधारीत निवडणूक नियमांचे अनुषंगाने सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांच्या निवडणूक खर्चात सुसुत्रता आणणे, अनावश्यक खर्च टाळणे, निवडणूक खर्च नियंत्रीत व मर्यादीत ठेवण्यासाठी सहकारी संस्थेच्या सभासद संख्येनुसार (मतदार संख्येनुसार) निवडणूकीत होणाऱ्या खर्चाचे बदलते प्रमाण विचारात घेऊन सहकारी संस्थांच्या निवडणूकीसाठी अंदाजीत निवडणूक निधीचे व निवडणूकीतील बाबनिहाय खर्चाबाबत खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

### अ. जिल्हा / तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांनी करावयाची कार्यवाही :-

१. अंदाजित निवडणूक निधी मर्यादा ठरविण्यासाठी जिल्हा / तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांनी सहकारी संस्थेच्या निवडणूक मतदार यादीतील एकूण मतदारांची संख्या व खाली नमूद केलेल्या विवरण पत्रातील बाबनिहाय मर्यादा विचारात घेऊन अंदाजित निवडणूक निधी ठरवावा. त्यासाठी जिल्हा / तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांनी खालील विवरण पत्राप्रमाणे, संस्थेच्या मतदार यादीतील मतदार संख्येनुसार निवडणूकीसाठी आवश्यक असणारी मतदान केंद्र संख्या निश्चित करुन, खालील विवरणपत्रातील निवडणूकीकरीता निर्धारीत केलेल्या बाबनिहाय होणाऱ्या खर्चाची गणना करावी. त्यानुसार संस्थेकडून निधी भरुन घेण्यासाठी खालील विवरण पत्रानुसार अंदाजपत्रक तयार करुन, संस्थेकडुन निवडणूकीकरीता अंदाजित निवडणूक निधी रक्कमेची मागणी करावी. प्रती मतदान केंद्र मतदार संख्या किमान ४०० राहील याची दक्षता घ्यावी.

२. जिल्हा / तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांनी सहकारी संस्थांकडून मागणी केलेली अंदाजित निवडणूक निधीची रक्कम आपल्या बँक खात्यात A/c Payee रेखांकित धनादेश / डिमांड ड्राफ्ट / NEFT / RTGS व्दारे भरणा करुन घ्यावी. प्राधिकरणाने वेळोवेळी निवडणूकीसाठी लागणारा खर्च किमान ठेवण्याच्या दृष्टिने सूचना दिलेल्या आहेत. त्याचे अनुपालन करुन अकारण सहकारी संस्थांकडुन जादा निवडणूक निधीची मागणी करु नये.

३. जिल्हा / तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांनी निवडणूक निर्णय अधिकारी यांना रक्कम वितरीत करताना संबंधीत संस्थेचे नावासह निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नावाने रेखांकित धनादेशाने दयावी किंवा NEFT / RTGS द्वारे द्यावी.

४. जिल्हा / तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांनी संस्थेकडुन बँक खात्यात जमा झालेल्या तसेच नि.नि.अ. यांना वितरीत केलेल्या रक्कमांचे जमाखर्च तात्काळ प्राधिकरणाने विहीत केलेल्या नोंदवहीत नोंदवावेत.

५. जिल्हा / तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांनी मतदार यादी छपाईचा खर्च हा संबंधीत यादी खरेदी करण्याऱ्या सभासदाकडून वसुल करावा व त्याची किंमत महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ३० अन्वये आकारणी करावी. सदर बाब ही प्राप्त निवडणूक निधीत दर्शवावी. जिल्हा / तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांनी त्यांचे स्तरावरील झालेल्या खर्चाचा समावेश निवडणूक खर्चात करावा.

६. जिल्हा / तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांनी निवडणूक निकाल जाहीर झाल्यानंतर १५ दिवसात नि.नि.अ. यांचेकडुन मर्यादेपेक्षा जास्त निवडणूक निधी खर्च झाला असल्यास प्रस्ताव प्राप्त करुन घ्यावेत. सदर प्रस्ताव स्विकारताना नि.नि.अ. यांनी प्रपत्र १ ते २८ मधील क्रमाने निवडणूक खर्चाच्या पावत्या स्वत:च्या सही शिक्यानिशी (Self Attested) प्रमाणित करुन जोडल्या आहेत का त्याची तपासणी करावी. तसेच प्रस्तावासोबत प्रपत्र १ ते २१ आणि १ ते ३१ मधील सर्व रकान्यांची संपूर्ण माहिती नमूद करुन जोडली असल्याची खात्री करावी. सदर बाबींच्या पुर्ततेची खात्री केल्यानंतरच नि.नि.अ. यांनी सादर केलेले मर्यादेपेक्षा जास्त निवडणूक निधी खर्चाचे प्रस्ताव आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह प्राधिकरणास निवडणूक निकालाचे दिनांकापासून एक महिन्याचे आत मान्यतेस्तव सादर करावेत.

७. निवडणूक निकाल जाहिर झाल्यानंतर ७ दिवसांचे आत जिल्हा / तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांनी निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडुन निवडणूक अहवाल प्राप्त करुन घेऊन संबंधित सहकारी संस्थेची निवडणूक निधीची शिल्लक रक्कम संस्थेस रेखांकित A/c Payee धनादेश, NEFT/RTGS व्दारे निवडणूक निकालाचे दिनांकापासून एक महिन्याचे आत परत करुन त्या संस्थेच्या निवडणूक निधीच्या वैयक्तीक खात्यावरील बाकी निरक करावी.

८. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांनी कॅलेंडर वर्षात होणा-या निवडणूकांचा अंदाज घेऊन वर्षभरासाठी जिल्हयात होणा-या संस्थांच्या निवडणूक प्रित्यर्थ खरेदी करणे आवश्यक असणा-या साहित्यासाठी जाहिर निविदा प्रक्रिया राबवून पुरवठादार निश्चित करावेत जेणेकरुन साहित्याचे दर अवास्तव राहणार नाहीत. सदर पुरवठादारांकडे TAN व VAT (GST) नंबर असावा.

९. जिल्हा / तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिका-याने अंदाजित निवडणूक खर्च व अंतिम निवडणूक खर्चाचे तपशील प्रपत्र १ ते २८ नुसार तपशिलवार देयकांचे प्रतीसह अभिलेखात जतन करुन ठेवावे. प्रत्येक संस्थेच्या निवडणूकीत केलेल्या खर्चाची माहिती १ ते २१, १ ते २८ आणि १ ते ३१ विवरणपत्रात प्राधिकरणास सादर करणे बंधनकारक राहिल.

१०. जिल्हा / तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांनी निवडणूक खर्चाबाबत काटकसरीचे धोरणांची अंमलबजावणी करावी. अनावश्यक खर्च टाळावेत.

**ब. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी करावयाची कार्यवाही :-**

निवडणूक निर्णय अधिकरी म्हणून नियुक्ती झाल्यानंतर निवडणूक निधी खर्चाबाबत खालील प्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

१. **'अ' व 'ब'** वर्गातील संस्थांच्या बाबत जिल्हा सहकारी निवडणूक अधिका-याकडून रेखांकित धनादेशाद्वारे प्राप्त रक्कम निवडणूक निर्णय अधिकारी यांनी संबंधीत संस्थेच्या नावासह निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नावाने बँक चालू खाते उघडून त्यामध्ये रक्कम भरणा करावी. **'क' व 'ड'** वर्ग संस्थांचे बाबतीत निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नावाने एकच चालू खाते असावे. संस्थां निहाय प्राप्त निवडणूक निधीचा तपशील व त्याचा हिशोब निवडणूक प्रक्रिया पूर्ण झालेनंतर ७ दिवसात संबंधित जिल्हा / तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिका-याकडे सादर करावा. व एक प्रत थेट प्राधिकरणास सादर करावी. रु.२०,०००/- च्या आतील बाबनिहाय प्रदानाच्या रक्कमा धनादेशाने / रोखीद्वारे व रु.२०,०००/- वरील रक्कमांचा खर्च रेखांकित धनादेशाद्वारे / NEFT / RTGS द्वारे करावा.

२. ज्या बाबींची खरेदी करावयाची आहे त्याबाबींची जाहिर निविदा / कोटेशन मागवून व तुलनात्मक तक्ता करुन कमी दराच्या निविदा / कोटेशन अंतिम कराव्यात. रु.५०,०००/- पेक्षा जास्त खरेदीसाठी कोटेशन मागवावे त्यापेक्षा कमी रक्कमेस कोटेशन मागविणेची आवश्यकता नाही. सदर खरेदी जिल्हाधिकारी यांच्या मंजूर दरसूचीनुसार खरेदी करण्यात यावे. किंवा यासाठी जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांनी विहीत जाहिर निविदा प्रक्रिया राबवून निश्चित केलेल्या पुरवठादार (शक्यतो TAN व VAT (GST) नंबर असलेल्या) यांचेकडुन खरेदी करावेत. वस्तुचीं खरेदी करताना वस्तुंचा दराबाबत जिल्हाधिकारी यांच्याकडील दरसुचीतील दर हे आधारभूत मानावे त्यापेक्षा जास्त दर दिला जावू नये.

३. अपवादात्मक परिस्थितीत उपरोक्त निर्धारीत व अंदाजित निवडणूक निधीपेक्षा जास्त निवडणूक निधी लागणार असल्यास निवडणूक निर्णय अधिकारी यांनी त्याबाबतच्या खर्चाचे समर्थनीय कारणासह तपशिलवार प्रस्ताव जिल्हा / तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांचेकडे सादर करावा व त्यांचेकडून मंजूर करुन घ्यावा. त्यांचे मंजूरीनंतरच जादा निवडणूक निधी जिल्हा / तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांचेमार्फत दिला जाईल. मात्र कोणत्याही परिस्थितीत मंजूर केलेली अथवा न केलेली रक्कम संस्थेकडून परस्पर उचल करु नये. सदर कार्यवाही कोणत्याही परिस्थितीत निवडणूकीतील मतदानाच्या नियत दिंनाकापूर्वी जि.स.नि.अ. / ता.स.नि.अ. यांनी पुर्ण करावी.

४. प्रत्येक संस्थेच्या निवडणूकीत केलेल्या खर्चाची माहिती १ ते २१, १ ते २८ आणि १ ते ३१ विवरणपत्रात जिल्हा / तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी व प्राधिकरणास सादर करणे बंधनकारक राहिल.

५. निवडणूकीचा खर्च मर्यादेत झाल्यास निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निवडणूक निकाल घोषित केल्याच्या दिनांकापासून ७ दिवसात निवडणूक खर्चाचा हिशोब पुर्ण करुन त्यांच्याकडील शिल्लक अखिर्चित रक्कमा जिल्हा / तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिका-यांकडे निवडणूक अहवालासह परत कराव्यात. जिल्हा / तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिका-यांनी निवडणूक निकालाचे दिनांकापासून एक महिन्याच्या आत

त्यांच्याकडील शिल्लक रक्कमा असल्यास त्या संस्थेस परत करावी. व झालेल्या जमा खर्चाची माहिती / तपशिल संस्थेस देणे बंधनकारक राहिल.

६. निवडणूकीचा खर्च मर्यादेपेक्षा जादा झाल्यास निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निवडणूक निकाल जाहिर केल्यानंतर १५ दिवसात अंदाजित निवडणूक निधी मर्यादेपेक्षा ज्यादा झालेल्या खर्चाचे प्रस्ताव जिल्हा / तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिका-यांकडे सादर करावेत. प्रस्ताव सादर करताना निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निवडणूक खर्चाच्या पावत्या स्वत:च्या सही शिक्यानिशी (Self Attested) प्रमाणित करुन प्रपत्र १ ते २८ नुसार क्रमाने लावून प्रस्तावासोबत जोडाव्यात. तसेच प्रस्तावासोबत प्रपत्र १ ते २१. १ ते २८ व १ ते ३१ मधील संपूर्ण माहिती सादर करावी.

७. निवडणूक निधीमधूनच सर्व मानधन व भत्ते, पदाधिकारी निवडणूकीचा परिश्रामिक खर्च करावयाचा आहे. त्यासाठी निवडणूक निर्णय अधिका-यांने परस्पर संस्थेकडून स्वंतत्र निवडणूक निधीची मागणी करु नये. तसेच संस्थेस निवडणूक प्रित्यर्थ कोणताही खर्च परस्पर करणेस सांगू नये. (प्राधिकरणाकडील आदेश समक्र.८२५७/१७ दि.७.१२.१७ नुसार निवडणूकीसाठीचा पोलिस बंदोबस्त वगळून)

८. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी शिल्लक अखर्चित निवडणूक निधी निवडणूक निकाल घोषित झालेपासुन ७ दिवसांचे आत जिल्हा / तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांना परत करुन त्याची पोहच दप्तरी ठेवावी. उमेदवार अनामत ठेव रक्कमेचे प्रदानासाठी निवडणूक निकाल घोषित झालेचे दिनांकापासून ७ दिवसाचे आत उमेदवारांचे नावाने रेखांकित धनादेश संस्थेस सुपूर्त करावेत. आणि त्याची पोहोच / पावती घ्यावी. तसेच संस्थेने सदर धनादेश संबंधिताचे खात्यात जमा करावेत किंवा संबंधितास देण्यात यावेत आणि पोहोच दप्तरी ठेवावी.

९. निवडणूक नियम ७० नुसार जप्त केलेली उमेदवार ठेव अनामत रक्कम प्राधिकरणाचे पुणे येथील खात्यावर निवडणूक निकालाचे दिनांकापासून ७ दिवसाचे आत वर्ग करावी व त्याचा अहवाल प्राधिकरणास सादर करावा. सदर जप्त रक्कम **राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, निवडणूक निधी (बँकेचे नाव – स्टेट बँक ऑफ इंडीया, शाखा - पुणे मुख्य, खाते क्र.३४९४४७०३३३८)** या नावाने धनाकर्षाव्दारे (DD) / बँकर्स चेकव्दारे प्राधिकरणास समक्ष सादर करावी.

१०. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निवडणूक प्रक्रीया राबविताना प्राधिकरणाच्या निवडणूक खर्च काटकसरीच्या धोरणांची काटेकोरपणे अमंलबजावणी होईल यांची दक्षता घ्यावी. निवडणूक खर्च करतांना बचतीचे धोरण ठेवावे. अनावश्यक व दुबार खर्च करण्यात येऊ नये.

## <u>क.</u> विवरणपत्रातील २८ बाबींबाबत मार्गदर्शक सूचना :-

विवरणपत्र

| अ.क्र. | तपशिल | नविन प्रस्तावित |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | **मतपत्रिका छपाई**<br><br>**I. सर्वसाधारण**<br>**ii. महिला**<br>**iii.अ.जा./अ.ज.**<br>**iv. इमाव**<br>**v.वि.जा./भ.ज./वि.मा.प्र.** | निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने मतपत्रिका छपाई करताना ती प्राधान्याने शासकीय मुद्रणालयाकडून छपाई करुन घ्यावी. तसे शक्य होत नसल्यास समर्थनीय कारणे नमूद करुन सहकारी अथवा खाजगी मुद्रणालयांकडून छपाई करुन घ्यावी. त्याबाबत किमान ३ दरपत्रके मागवून घेण्यात यावीत व दर ठरविताना खालील प्रमाणे किमान व कमाल मर्यादा निर्धारीत करण्यात येत आहे. त्यापेक्षा जादा खर्च अनुज्ञेय नाही. |

| | | |
|---|---|---|
| | | i. सर्वसाधारण रु. ४ ते रु. ६<br>ii. महिला रु. ३ ते रु. ४<br>iii. अजा / अज रु. ३/-<br>iv. इमाव रु. ३/-<br>v. विजा / भज / वि.मा.प्र रु. ३/-<br>या दरापेक्षा जास्त खर्च अनुज्ञेय नाही. तथापि वरील प्रमाणे दरामध्ये अपवादात्मक परिस्थितीत छपाई शक्य नसल्यास जिल्हा सहकारी निवडणूक अधिका-याची पूर्व परवानगी घेण्यासाठी सकारण प्रस्ताव देऊन छपाई करण्यात यावी. तसेच मतदानासाठी मतपत्रिका छपाई करताना एकुण मतपत्रिकेच्या १०% जादा पत्रिका छपाई करुन घेण्यास हरकत नाही, मात्र त्यापेक्षा जादा मतपत्रिका छपाई करु नये.<br>जिल्हा सहकारी निवडणूक अधिकाऱ्याने संपूर्ण जिल्हयासाठी वरील बाबी विचारात घेऊन मुद्रणालय एजन्सी निश्चित कराव्यात जेणे करुन वारंवार दरपत्रक मागविण्याची आवश्यकता राहणार नाही. तथापि असे छपाई करणारे मुद्रणालयाची निश्चिती करण्यासाठी जाहिर निवीदा द्यावी. याप्रमाणे संपुर्ण जिल्हयाकरीता एजन्सी निश्चित केल्यास DCEO ने उपरोक्त प्रकारनिहाय मतपत्रिका छपाई दर निश्चित करावेत. निविदेद्वारे निश्चित होणारे दर वर दिलेल्या दरांपेक्षाही किंवा शासकीय मुद्रणालयाच्या दरापेक्षाही कमी येण्याची संभावणा असेल. तथापि अंतिम दर निश्चित करताना शासकीय मुद्रणालयाच्या दरांपेक्षा प्रस्तावित दर जास्त नसतील हयाची खबरदारी घ्यावी. **नजीकच्या भविष्यात भाडेतत्वावरील E.V.M. द्वारे निवडणूक घेणेचे प्रस्तावित आहे. E.V.M. द्वारे निवडणूक घेणेचा निर्णय झालेस मतपत्रिका छपाईचा प्रश्नच येणार नाही.** |
| २. | मतपेटी खरेदी / भाडयाने घेणे (संख्या) | मागील पाच वर्षात जिल्हयामध्ये अनेक सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्यात आल्या आहेत. सदर निवडणूकांच्या वेळेस निवडणूक निर्णय आधिकारी यांनी मतपेटया खरेदी केलेल्या आहेत. जिल्हा / तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांनी सदर सर्व खरेदी केलेला मतपेटया त्यांचेकडे जमा करुन घ्याव्यात व जिल्हा / तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांनी निवडणूक घेतलेल्या व त्यासाठी मतपेटी नव्याने खरेदी केलेल्या संस्थेच्या नावानिशी सदर मतपेटयांची संख्या प्राधिकरणास सादर करावी व शक्यतो यापुढे सदर मतपेटयांचाच वापर करावा. प्रत्येक वेळी नव्याने मतपेटया खरेदी करण्याचे टाळावे. अपरिहार्य परिस्थितीत नव्याने मतपेटी खरेदी करताना खरेदीची किंमत रु.५००/- ते रु.८००/- प्रती पेटी निर्धारित करण्यात येत आहे. तसेच भाडयाने घेताना प्रती मतपेटी भाडे ***जास्तीत जास्त रु. १००/-*** इतके दराने घेण्यास हरकत नाही. वरील मर्यादेपेक्षा जादा दराची अकारणी केल्यास वाढीव खर्च अनुज्ञेय राहणार नाही. **E.V.M. द्वारे निवडणूक घेणेचे आदेशीत झालेस मतपेटी खरेदीचा प्रश्नच उदभवणार नाही.** |
| ३ | प्रत्यक्ष मतदान केंद्रांवर लागणारी स्टेशनरी उदा. बाणफुलीचे शिक्के, कुलुप, लाख, लिफाफे, इंकपॅड, शाई, मतदान कक्ष साहित्य, इ. | यामध्ये मतदान व मतमोजणीसाठी लागणारे सर्व साहित्याचा समावेश होईल. सर्वसाधारणपणे प्रत्येक केंद्रात १ याप्रमाणे प्रत्येक वस्तुचे नग खरेदी करावे व काही साहित्य राखीव (२०%) स्वरूपात निवडणूक निर्णय अधिकारी यांचे स्तरावर ठेवावे साधारणत: पहिल्या दोन केंद्रासाठी प्रत्येकी रु.१,५००/- व नंतर प्रति केंद्र रु.१,०००/- च्या आत खर्च अनुज्ञेय राहिल. (मतपेटी खर्च वगळून) याबाबत संदर्भ क्र.१३ चे आदेशातील सुचना विचारात घ्याव्यात. |

| | | |
|---|---|---|
| ४. | बुथ संख्या वाहन संख्या व वाहन खर्च | प्रत्येक स्वतंत्र स्थळी असलेल्या मतदान केंद्रास स्वतंत्र वाहन पुरविणे आवश्यक असल्यास ते देण्यात यावे. एका मतदान केद्रांवर कमीत कमी ४०० इतकी मतदारांची संख्या असावी. भाडयाने घेतलेल्या गाडयांसाठी भाडे ठरविताना महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ मधील नियम ६३ (३) च्या तरतूदीनुसार प्रत्येक जिल्हा निहाय जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील व प्रादेशिक परिवहन अधिकारी सदस्य असलेल्या कमिटीने मान्य केलेल्या दरानुसार भाडोत्री वाहनास दर देण्यात यावा. यासाठी जिल्हयातील ५ पेक्षा जास्त एजन्सींकडून विहीत दरानुसार गाडया भाडयाने घेण्यासाठी एजन्सी नियुक्त करावी व त्याप्रमाणे खर्च (भाडे) अदा करावे. जिल्हा सहकारी निवडणूक अधिका-यांनी जिल्हयासाठी वार्षिक यंत्रणा निश्चित केल्यास शासकीय कमीटीने निश्चित केलेल्या दरांपेक्षाही कमी दर येण्याची शक्यता असेल. जीप वाहन अनुज्ञेय राहील. कार किंवा लक्झरी वाहने भाडे तत्वावर अनुज्ञेय राहणार नाही.<br>वरील प्रमाणे एजन्सी निश्चित न केल्यास वाहन भाडयाने घेताना ३०० कि.मी. पर्यंत रु.२०००/- ते रु.२५००/- इतके भाडे डिझेल खर्चासहित प्रती दिन प्रती बुथ अनुज्ञेय राहील. मात्र ३०० कि.मी. पेक्षा जास्त अंतरासाठी प्रादेशिक परिवहन विभागाने निश्चित केलेल्या दराप्रमाणे भाडे अनुज्ञेय राहील. |
| ५ | **मतदान केंद्र भाडे** | मतदान केंद्र भाडयाने घेताना संबंधीत संस्थेच्या जागांचा वापर प्राधान्याने करावा. अशा जागा नसल्यास इतर सहकारी संस्था, जिल्हा परिषदेच्या शाळांचा व स्थानिक स्वराज्य संस्थांचा वापर करावा व खर्च नियंत्रणात ठेवावा. तसेच मंगल कार्यालयाची / खाजगी जागा शक्यतो घेवू नये. |
| ६. | **मतदान केंद्र वीज / पाणी / जनरेटर / बल्ब इं**<br>***(जनरेटर चा वाहतूक खर्चासह)*** | मतमोजणीसाठी जनरेटरची आवश्यकता असू शकते. त्यामुळे प्रत्येक मतदान केंद्रावर जनरेटर ठेवू नये. फक्त मतमोजणी च्या ठिकाणी जनरेटर व्यवस्था करण्यात यावी. सदर खर्चाची बीले देताना अन्य बाबींचा त्यात समावेश करु नये. केंद्रनिहाय वीज / पाणी. बल्ब व जनरेटर यावरील केलेलाच खर्च नमूद करण्यात यावा. सदरचा एकत्रित खर्चाचा दर रु. ***२०००/- ते २५००/-*** इतका निर्धारीत करण्यात येत आहे. यापेक्षा जादा खर्च अनुज्ञेय असणार नाही. ***अथवा हयाबाबतची जिल्हाधिकारी यांचेकडे दरसूची उपलब्ध असल्यास त्यानुसार अनुज्ञेय असेल.*** |
| ७. | **मतदान केंद्र कर्मचारी जेवण, चहा नाष्टा,** | निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, मतदान प्रतिनिधी व मतदान केंद्रावर निर्धारीत केलेल्या कर्मचाऱ्यांना प्रत्येकी चहा, नाष्टा, व जेवणासाठी रु.२००/- रुपये इतका खर्च (भत्ता) त्याचा पुरवठा केला नसल्यासच अनुज्ञेय राहील. सदर भत्ता मतदान पूर्व दिवस (मुक्कामी जावे लागल्यास) प्रत्यक्ष मतदान दिनांकास व मतमोजणी दिनांकास घेण्यासच पात्र राहील. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सदर मर्यादेत चहा, जेवण, व नाष्टा उपलब्ध करुन दयावयाच्या आहे. मात्र उपरोक्त प्रमाणे चहा, जेवण नाष्टा उपलब्ध करुन दिल्यानंतर रोख स्वरुपात भत्ता देऊ नये. प्रती मतदान केंद्रासाठी मतदानाच्या दिवशी कर्मचारी ७ + इतर २ यापेक्षा जास्त कर्मचाऱ्यांना भोजन अथवा भत्ता अनुज्ञेय असणार नाही. नियुक्त कर्मचाऱ्यांना भोजन दिले गेल्यास त्याचा खर्च भोजन भत्त्याच्या मर्यादेत अनुज्ञेय राहील. |

**८.** **मतदान केंद्र कर्मचारी मानधन (संख्या), मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी, व शिपाई**

प्रत्येक मतदान केंद्रासाठी साधारणत:

१. केंद्राध्यक्ष - १
२. मतदान अधिकारी - ३ + १ (आवश्यकते प्रमाणे)
३. शिपाई - १
४. राखीव अधिकारी/कर्मचारी - १
५. राखीव शिपाई - १

**एकुण - ८**

असे एकुण ०८ कर्मचारी असावेत. त्यापेक्षा जास्त असू नयेत. DCEO ने एखादे मतदान केंद्र संवेदनशील असेल अशा ठिकाणी अतिरिक्त कर्मचारी नियुक्ती बाबत निर्णय घ्यावा. व तसे समर्थनीय कारण या सदरातील बाबीत नमूद करावे.

मतदान केंद्र कर्मचारी यांना प्रवास भत्ता अदा केल्यास वाहन खर्च अनुज्ञेय असणार नाही.

| | |
|---|---|
| ४ ते ५ मतदार संघासाठीच्या मतपत्रिकासाठी | ८ कर्मचारी |
| २ ते ३ मतदार संघासाठीच्या मतपत्रिकासाठी | ६ कर्मचारी |
| १ मतदार संघासाठीच्या मतपत्रिकेसाठी | ५ कर्मचारी |

**मानधन व भत्ते**

| अधिकारी / कर्मचारी पदनाम | प्रशिक्षणासाठी मानधन | | मतदान पूर्व दिवस व मतदान दिनांक रोजी साठी मानधन व भत्ते प्रती व्यक्ती प्रती दिन | |
|---|---|---|---|---|
| | मानधन | अल्पोहार भत्ता | मानधन | भोजन भत्ता |
| केंद्राध्यक्ष | ४०० | ७५ | ४०० | २०० |
| मतदान अधिकारी | ३०० | ७५ | ३०० | २०० |
| शिपाई | २०० | ७५ | २०० | २०० |
| राखीव कर्मचारी | ३०० | ७५ | ३०० | २०० |
| राखीव शिपाई | २०० | ७५ | २०० | २०० |

**९.** **मतमोजणी वेळी लागणारी साहित्य उदा. टेबल, खुर्ची भाडे, सुरक्षितता उपाय, योजना, साहित्य खरेदी, स्पीकर , मंडप इ.**

मतमोजणी केंद्रासाठी साधारणत: पुढील प्रमाणे साहित्याची आवश्यकता असते.

१. टेबल २. खुर्ची ३. नोटीस बोर्ड ४. जनरेटर

(आवश्यकते प्रमाणे जिल्हाधिकारी यांचेकडील दरसूचीनुसार लागू राहतील किंवा जिल्हा निवडणूक निर्णय अधिका-यांनी वार्षिक निविदेनुसार पुरवठादार निश्चित केलेला असेल त्यानुसार)

टेबल, खुर्ची, नोटीस बोर्ड इत्यादी सर्व साहित्य हमाली व वाहतूक खर्चासह एका मतदान केंद्रास रु.१५००/- ते २०००/- अनुज्ञेय राहिल.

वरील प्रमाणे साहित्यांची आवश्यकता असावी. साधारणत: मंडप उभारणी वर अनाठायी व अनावश्यक खर्च करु नये. मंडप टाकण्या ऐवजी हॉल (मंगल कार्यालय) भाडयाने घेणे उचित होईल, त्यावर खर्च कमी होवू शकतो व अशा हॉल मध्ये कारपेट

| | | |
|---|---|---|
| | | टाकू नये. शितकरणासाठी खर्च करु नये. अपवादात्मक परिस्थितीमध्ये हॉल व मंगल कार्यालय उपलब्ध नसल्यास 'अ' वर्गातील सर्व संस्थांना व ***ब वर्गातील ५००० पेक्षा जास्त मतदार असलेल्या संस्थांसाठी*** गरजेनुसार तसेच ब वर्गातील नागरी बँकांच्या मतमोजणीसाठी सदरचा खर्च ***प्राधिकरणाच्या*** पूर्वपरवानगीने अनुज्ञेय राहील. परंतु 'क' व 'ड' वर्गातील संस्थांसाठी मंगल कार्यालय, हॉल व मंडप इ. बाबींवरील खर्च अनुज्ञेय राहणार नाही. |
| १०. | **मतमोजणी केंद्र भाडे** | मतमोजणीसाठी जिल्हा/तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांनी प्रत्यक्ष सहकारी संस्थेच्या स्वत:च्या सभागृहाचा (असल्यास) प्राधान्याने विचार करावा. तसेच जिल्हा परिषदेच्या शाळा, सहकारी संस्थेची कार्यालये व सभागृह इ. चा विचार करावा. |
| ११. | **मतमोजणीसाठी लागणारी स्टेशनरी** | **मतमोजणीसाठी साधारण खालील साहित्य आवश्यक असते.**<br>१. खळ - १<br>२. टोचा - १<br>३. ट्रे - २ प्रति टेबल<br>४. पेन,पट्टी - १<br>५. जाहिरात बोर्ड - केंद्रावर १<br>६. कॅल्युलेटर - १<br>७. बॉक्स फाईल - १ प्रति टेबल<br>८. पेपर टाचणी बॉक्स इ.<br>खर्चाची मर्यादा सर्वसाधारणपणे रु.४००/- ते रु.६००/- प्रती टेबल इतकी निर्धारित करण्यात येत आहे. प्रती टेबल मतपत्रिका संख्या ४०० निर्धारित करण्यात येत आहे.<br>साधारणत: प्रत्येक टेबलसाठी लागणा-या साहित्यांपैकी जे साहित्य वारंवार वापरले जाऊ शकते ते साहित्य निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने जिल्हा / तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांचेकडे जमा करावे. जिल्हा / तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांनी त्याचा अन्य निवडणूकीत वापर करणेसाठी उपयोग करावा. याबाबत संदर्भ क्र.१३ चे आदेशातील सुचना विचारात घ्याव्यात. |
| १२. | **मतमोजणी कर्मचारी जेवण, नाष्टा, चहा** | मतमोजणीसाठी उपस्थित असलेल्या प्रतिनिधी / उमेदवार, निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी व कर्मचारी यांना भत्ता न देता त्यांना जेवण, चहा व नाष्टा मतमोजणी केंद्रावर देण्यात यावा. साधारणत: जेवण, चहा, व नाष्टा इ. साठी प्रति कर्मचारी रु.२००/- इतका खर्च अनुज्ञेय राहिल. त्यापेक्षा जास्त अनुज्ञेय नाही. भोजन भत्याच्या मर्यादेत खर्च करण्यात यावा. |
| १३. | **मतमोजणी कर्मचारी मानधन** | **मतमोजणी कर्मचा-यांसाठी मानधन पुढील प्रमाणे राहील**<br>१. पर्यवेक्षक – रु.४००/-<br>२. सहाय्यक – रु.३००/-<br>३. एकत्रीकरण करणे – रु.३००/-<br>४. रो ऑफीसर – रु.३५०/-<br>५. राखीव – रु.३००/-<br>६. शिपाई – रु.२००/-<br>(५ टेबलांसाठी १ रो ऑफीसर राहिल.) |
| १४. | **मतदान व मत मोजणीचा पोलिस** | गृह विभागाने निश्चित केलेल्या दराप्रमाणे रक्कमा अदा केल्यानंतर पुन्हा प्रत्यक्ष हजर असलेल्या कर्मचाऱ्यांना मानधन दिले जाते. तथापी अशा प्रकारे दुबार मानधन देऊ |

<table>
<tr><td></td><td>कर्मचारी मानधन</td><td>नये. मात्र त्यांना चहा, नाष्टा, व जेवण मतदान व मतमोजणीच्या दिवशी देण्यात यावे. सदरचा खर्च रु.२००/- प्रती व्यक्ती मर्यादेत अनुज्ञेय राहील.</td></tr>
<tr><td>१५</td><td>निवडणूक कार्यक्रम प्रसिध्दी व जाहीरात खर्च</td><td>शासन मान्य दराप्रमाणे जाहिरात देवून जास्तीच्या खपाच्या स्थानिक वर्तमान पत्रात द्यावी. एकच जाहिरात एका पेक्षा जास्त वर्तमानपत्रात देवू नये. जाहिरात देताना संस्थेचे कार्यक्षेत्र, वर्गीकरण यांचा विचार करून संस्थेच्या आर्थिक क्षमतेनुसार कमीत कमी आकारमानाची जाहिरात द्यावी. क वर्गातील संस्थांची जाहिरात एकत्रितरीत्या द्यावी म्हणजे प्रती संस्था खर्च विभागला जावून खर्च कमी होईल. प्राधिकरणाचे नामतालिकेवरील अभिकर्ता व्यतीरिक्त इतर अभिकर्त्यामार्फत जाहिरात दिल्यास शासन मान्य दरापेक्षा जास्त जाहिरात खर्च अनुज्ञेय राहणार नाही.</td></tr>
<tr><td>१६.</td><td>उमेदवारी अर्ज छपाई व त्यावेळी लागणारी स्टेशनरी खरेदी</td><td>हयामध्ये पुढील बाबींचा समावेश होतो. व त्याची प्रती नग किंमत निश्चित करण्यात आलेली आहे.<br>१. उमेदवारी अर्ज<br>२. पावती बुक<br>३. नोंदवहया<br>प्रस्तुतचा खर्च रु.७५०/- ते रु.१०००/- अनुज्ञेय राहील. तथापी विहीत केलेली स्टेशनरी प्राधिकरणामार्फत उपलब्ध करुन दिल्यास वरील प्रमाणे खर्च अनुज्ञेय राहणार नाही.</td></tr>
<tr><td>१७.</td><td>जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी मानधन / तालुका सहकारी निवडणूक अधिकारी मानधन</td><td>जिसनिअ व तासनिअ यांना खालील प्रमाणे मानधन अनुज्ञंय राहील.
<table>
<tr><th>अ वर्ग (रु.)</th><th>ब वर्ग - १ (विकास संस्था वगळून) (रु.)</th><th>ब वर्ग — २ (विकास संस्था) (रु.)</th><th>क वर्ग (रु.)</th><th>ड वर्ग (रु.)</th></tr>
<tr><td>१</td><td>२</td><td>३</td><td>४</td><td>५</td></tr>
<tr><td>१५०००/-</td><td>नागरी बँका राज्य स्तरीय पत संस्था - ७५००/-<br>उर्वरित संस्था- ५०००/-</td><td>नफयातील ४०००/-<br>तोटयातील २०००/-</td><td>२५००/-</td><td>नफा १०००/-<br>तोटा ७५०/-</td></tr>
</table></td></tr>
<tr><td>१८</td><td>निवडणूक निर्णय अधिकारी</td><td>निवडणूक निर्णय अधिकारी यांना खालील प्रमाणे मानधन अनुज्ञंय राहील.
<table>
<tr><th>संस्था वर्गवारी</th><th>निवडणूक (रु.)</th><th>बिनविरोध(रु.)</th></tr>
<tr><td>अ</td><td>२५,०००</td><td>१२,५००</td></tr>
<tr><td>ब १ (विकास संस्था वगळून )</td><td>२०,०००</td><td>१०,०००</td></tr>
<tr><td>ब २ (विकास संस्था नफा )</td><td>१०,०००</td><td>५,०००</td></tr>
<tr><td>ब २ (विकास तोटा)</td><td>७,५००</td><td>३,५००</td></tr>
<tr><td>क</td><td>१५,०००</td><td>७,५००</td></tr>
<tr><td>ड नफा</td><td>२,०००</td><td>१,०००</td></tr>
<tr><td>ड तोटा</td><td>१,५००</td><td>७५०</td></tr>
</table>
ड वर्गासाठी प्राधिकृत अधिकारी यांचे प्रवास खर्च रु.७५०/- महत्तम अनुज्ञेय राहिल.</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| १९. | **सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी** | अ, ब व क वर्गातील संस्थांच्या निवडणूकीकरीता सहाय्यक निवडणूक निर्णय अधिका-यास, निवडणूक निर्णय अधिका-याच्या मानधनाच्या ५०% इतके अनुज्ञेय राहील. (विकास संस्था व आदिवासी विकास संस्था वगळून.)<br>ड वर्गातील प्राधिकृत अधिकारी यांना निवडणूकीकरीता १ सहाय्यक अनुज्ञेय राहील. त्यास मानधन एकुण रु.५००/- अनुज्ञेय राहील. |
| २०. | **व्हिडीओ पथक खर्च** | व्हिडीओ पथक नियुक्ती सरसकट करु नये. सदर केंद्र संवेदनशिल असल्याबाबत निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने व्हिडीओ पथक नियुक्ती बाबत मागणी केल्यास DCEO / TCEO ने प्रथम खात्री करावी व त्यांनी शिफारस केलेल्या केंद्रांबाबतच पथकाची नियुक्त करावी. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटचा दिवस, अर्ज माघारीचा शेवटचा दिवस, उमेदवारी अर्ज छाननी, चिन्ह वाटप, मतदान दिवस व मतमोजणी या कार्यक्रमांच्या वेळेस व्हिडीओग्राफी करावी. सरसकट पथक नियुक्ती करु नये. वरील बाबी विचारात घेऊनच प्रती बुथ रु.४०००/- पर्यत अनुज्ञेय राहिल. जिल्हाधिकारी यांचे दरसूचीप्रमाणे खर्चाचे निकष राहतील. |
| २१. | **कायदा/ सुव्यवस्थेसाठी पोलिस बंदोबस्त खर्च** | गृह विभागाने निश्चित केलेल्या दराप्रमाणे रक्कमा अदा केल्यानंतर पुन्हा प्रत्यक्ष हजर असलेल्या कर्मचाऱ्यांना मानधन दिले जाते. तथापी अशा प्रकारे दुबार मानधन देऊ नये. मात्र त्यांना चहा, नाष्टा, व जेवण मतदान व मतमोजणीच्या दिवशी देण्यात यावे. सदरचा खर्च रु.२००/- प्रती व्यक्ती मर्यादेत अनुज्ञेय राहील. |
| २२. | **जिल्हा व तालुका निवडणूक नियंत्रण कक्ष व आचार संहिता कक्ष** | जि.स.नि.अ. यांचेकडील निवडणूकीचा खर्च हिशोब लिहणे, चेक तयार करणे, प्राधिकरणाची माहिती पाठविणे, निवडणूक कामकाज पाहणे इ. कामांसाठी रु.५००/- प्रति कर्मचारी अनुज्ञेय राहील. (एकूण ब वर्ग संस्था संख्या ५०० पर्यंत २ कर्मचारी, १५०० पर्यंत ३ व त्याहून अधिक संस्थांकरीता ४ कर्मचारी अनुज्ञेय राहिल) मानधन प्रति संस्था अनुज्ञेय राहील.<br>- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -<br>तालुका निवडणूक नियंत्रण व आचार सहिंता कक्ष प्रति कर्मचारी रु.३००/- एवढे मानधन राहील व कक्षात जास्तीत जास्त दोन कर्मचारी अनुज्ञेय राहिल.<br>तसेच प्राधिकरणाने विहीत केलेले सर्व नोंदवहया, कॅश बुक, रोज किर्द (प्रपत्र १, प्रपत्र ४) इ. अदयावत ठेवणे. बँक पासबुकनुसार ताळमेळ घेणे, त्यानुसार महिना निहाय Reconcilation तयार करणे, प्राधिकरणास वेळोवेळी वरील नोंदवहया, अहवाल सादर करणे आवश्यक असुन सदर कामकाजात दिरंगाई अथवा त्रुटी आढळुन आल्यास संबंधितांना मानधन अनुज्ञेय राहणार नाही. |
| २३. | **अंतिम मतदार यादी छपाई खर्च** | अंतिम मतदार यादी छपाईचा खर्च प्रति पान रु.१/- असावा. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांचे मार्फत प्रसिध्दी करणे आवश्यक असलेल्या प्रतिपेक्षा जास्त प्रति छापून घेऊ नये. जर सभासदांनी मागणी केल्यास त्याबाबत आवश्यक ती फी घेऊन प्रत देण्यात यावी. त्या खर्चाचा भार निवडणूक निधीवर पडू देऊ नये. |
| २४. | **निवडणूक निरिक्षक व क्षेत्रिय अधिकारी यांचे मानधन व भत्ते** | निवडणूक निरिक्षकास 'अ' वर्ग संस्था रु.७०००/- , 'ब' वर्ग संस्था रु.५०००/- , 'क' वर्ग संस्था रु.२०००/- , 'ड' वर्ग संस्था रु.१०००/- इतके मानधन अनुज्ञेय राहील. तथापी निरिक्षकांची नियुक्ती प्राधिकरणाने केलेली असली पाहिजे व त्यांचा लेखी |

| | | |
|---|---|---|
| | | अहवाल प्राधिकरणास प्राप्त झाला तरच त्यांना मानधन अनुज्ञेय राहील अन्यथा अशा प्रकारचा केलेला खर्च अमान्य करण्यात येईल.<br>क्षेत्रिय अधिकारी यांना रु.३,०००/- प्रती संस्था मानधन अनुज्ञेय राहील. सर्वसाधारणपणे ५ ते ७ मतदान केंद्रांसाठी एका क्षेत्रिय अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी. |
| २५. | मतमोजणी कर्मचारी प्रशिक्षण खर्च | |

| | मतपत्रिका संख्या | टेबल | कर्मचारी संख्या | राखीव कर्मचारी |
|---|---|---|---|---|
| सर्व साधारण निकष | १ ते ४०० | १ | ४ | १ |
| | ४०१ ते ८०० | २ | ८ | २ |
| | ८०१ ते १२०० | ३ | १२ | ३ |

| अ.क्र | तपशिल | टेबल संख्या | कर्मचारी संख्या | मानधन रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | **मतमोजणी पर्यवेक्षक** | १ टेबलसाठी | २ | रु.४०० प्रत्येकी |
| २ | **मतमोजणी अधिकारी / सहाय्यक** | १ टेबलसाठी | २ | रु.३०० प्रत्येकी |
| ३ | **मतपत्रीका देवाण घेवाण** | ३ टेबलसाठी | १ | रु.२०० प्रत्येकी |
| ४ | **एकत्रिकरण** | ३ टेबलसाठी | १ | रु.३०० प्रत्येकी |
| ५ | **बाद मते हिशोब / टॅग लावणे** | ३ टेबलसाठी | १ | रु.३०० प्रत्येकी |
| ६ | **सिलिंग करणे** | ३ टेबलसाठी | १ | रु.३०० प्रत्येकी |
| ७ | **मदतनीस / रो ऑफीसर** | १३ टेबलसाठी | १ | रु.३५० प्रत्येकी |
| ८ | **शिपाई / कर्मचारी** | १० टेबलसाठी | १ | रु.२०० प्रत्येकी |

<table>
<tr><td></td><td></td><td>
प्रशिक्षण खर्च
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>तपशिल</th><th>मानधन (रुपये)</th></tr>
<tr><td>१</td><td>२</td><td>३</td></tr>
<tr><td>१.</td><td>मतमोजणी पर्यवेक्षक</td><td>४००</td></tr>
<tr><td>२.</td><td>मतमोजणी अधिकारी / सहाय्यक</td><td>३००</td></tr>
<tr><td>३.</td><td>मतपत्रीका देवाण घेवाणसाठीचे कर्मचारी</td><td>२००</td></tr>
<tr><td>४.</td><td>एकत्रीकरणासाठीचे कर्मचारी</td><td>३००</td></tr>
<tr><td>५.</td><td>बाद मते हिशेब व टँग करणे साठीचे कर्मचारी</td><td>३००</td></tr>
<tr><td>६.</td><td>सिलिंग प्रमुख</td><td>३००</td></tr>
<tr><td>७.</td><td>मदतनीस</td><td>२००</td></tr>
<tr><td>८.</td><td>रो ऑफीसर</td><td>३५०</td></tr>
</table>
</td></tr>
<tr><td>२६</td><td>पदाधिकारी निवडणूक अध्यासी अधिकारी मानधन</td><td>अ वर्गातील संस्थांसाठी रु.२,०००/- व ब वर्गातील राज्यस्तरीय पत व नागरी बँका यांना रु.१,५००/- व इतर संस्थांसाठी रु.१,०००/- क वर्ग संस्थांसाठी रु.५००/- व ड वर्गातील संस्थांसाठी पूर्वीप्रमाणेच रु.२५०/- इतके मानधन अनुज्ञेय राहिल. (ड वर्गासाठी अध्यासी अधिकाऱ्यास संस्थेमध्ये कामकाजानिमित्त केलेल्या प्रत्यक्ष प्रवास खर्चाची रक्कम रु.७५०/- चे मर्यादेत अनुज्ञेय राहील. )</td></tr>
<tr><td>२७</td><td>निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयातील मदतनीस मानधन.</td><td>मदतनीस म्हणून अ वर्ग संस्थाकरीता जास्तीत जास्त ५ व ब वर्गासाठी (जिल्हा व त्याहून जादा कार्यक्षेत्र असणा-या संस्थांना) ०३ इतके संस्थानिहाय मदतनीस आवश्यकतेप्रमाणे नियुक्त करता येतील. त्यांना रु.३००/- इतके मानधन प्रतीदिन अनुज्ञेय राहिल व त्यांना जास्तीत जास्त एकूण १० दिवसांसाठी मानधन अनुज्ञेय राहिल.</td></tr>
<tr><td>२८ अ</td><td>अनुषंगिक किरकोळ खर्च (वाहन भाडे, झेरॉक्स,स्टेशनरी)<br>१.निवडणूक कार्यक्रम प्रसिध्दी, निवडणूक केंद्र पहाणी, निवडणूक पूर्व तयारी व अध्यासी अधिकारी गाडी भाडे<br>२.झेरॉक्स, स्टेशनरी<br>३.उमेदवारी ते मतदान पूर्व कालावधीतील निवडणूक निर्णय अधिकारी यांचा आहार भत्ता</td><td>निवडणूक कामी होणाऱ्या एकुण खर्चाच्या ५% इतका खर्च अनुज्ञेय राहील. सदर खर्चाचे स्वरुप उपरोक्त नमुद केलेल्या खर्चाहून भिन्न असेल. हया बाबीचा सविस्तर उहापोह करणे व तपशिल देणे गरजेचे राहिल. काही प्रकरणांमध्ये उपरोक्त बाबींमध्ये खर्च दाखवून पुन्हा सदरचा खर्च या सदरात पुन्हा खर्च दाखविण्यात येतो. दुबार दाखविलेला खर्च अमान्य करण्यात येईल. शिवाय हयाबाबतच्या खर्चाचे साधार समर्थन आवश्यक राहिल.</td></tr>
<tr><td>२८ ब</td><td>कोवीड – १९ संदर्भात करावयाच्या उपाययोजनाबाबत</td><td>नजीकच्या काळात कोवीड -१९ या महामारीचा प्रादुर्भाव संपला नाही तर होणाऱ्या निवडणूका भयमुक्त व मोकळया वातावरणात पार पाडण्यासाठी कोवीड -१९ या महामारीचा फैलाव रोखण्याकरीता प्रतिबंधात्मक उपाययोजना</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | | करणेसाठी उदा.सॅनिटायजर, माक्स, हॅण्डग्लोज ई. खरेदीकरीता प्रति मतदान केंद्र रु.१०००/- पर्यंतचा खर्च अनुज्ञेय राहील. तसेच निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयासाठी रु.१०००/- पर्यंतचा खर्च अनुज्ञेय राहील. |

१. 'ड' वर्ग संस्थांचे बाबत प्राधिकरणाने निवडणूक निधी मर्यादा निश्चित केलेली आहे. सदर निवडणूक निधीच्या मर्यादेतच निवडणूक निर्णय अधिकारी / प्राधिकृत अधिकारी / अध्यासी अधिकारी यांनी खर्च व निवडणूक प्रित्यार्थचा खर्च होणे अपेक्षित आहे.

२. प्राधिकृत अधिकाऱ्याने सहकारी संस्थेकडून परस्पर रक्कम उचल करु नये. सहकारी संस्थांकडून निधी TCEO ने त्यांचे खात्यात जमा करुन घ्यावा व या खात्यातूनच TCEO ने प्राधिकृत अधिकाऱ्यास रक्कम अदा कराव्यात. प्राधिकृत अधिकाऱ्याने निवडणूकी प्रित्यर्थ केलेल्या प्रवास खर्चाची Self Attested पावती देणे बंधनकारक राहील. अशी पावती दिल्यावर TCEO ने प्रवास खर्चासाठी रक्कम उपलब्ध करावी.

३. संबंधित जिल्हा / तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांचेकडून संबंधित संस्थेस निवडणूक निधी रक्कमेची मागणी प्राप्त होताच जिल्हा / तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिका-याचे स्टेट बॅक ऑफ इंडिया अथवा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील बँक खात्यात अथवा प्राधिकरणाने ठरवून दिलेल्या बँक खात्यात A/c Payee रेखांकित धनादेश/डिमांड ड्राप्ट/NEFT/RTGS व्दारे रक्कम भरणा करावी. संस्थेने वरील खात्यावर रक्कम जमा केल्यानंतर त्याची माहिती संबंधित जिल्हा / तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांना लेखी सादर करावी. जिल्हा /तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिका-याने प्राधिकरणाने विहीत केलेल्या नमुन्यातील नोंदवहीत वेळोवेळी सहकारी संस्था निहाय बँक खात्यावरील जमा-खर्चाच्या नोंदी अद्यावत ठेवाव्यात.

४. निवडणूक प्रक्रीये दरम्यान प्राधिकरणाने विहीत प्रपत्रातील नमुद बाबींवरील सर्व खर्च संस्थेने जमा केलेल्या निवडणूक निधी मधुनच करावयाचा आहे. प्रपत्रातील नमुद बाबींवरील कोणताही खर्च संस्थेकडून परस्पर करुन घेऊ नये. (प्राधिकरणाचे आदेश समक्र.८२५७/१७ दिनांक ०७.१२.१७ अन्वये कायदा व सुव्यवस्थेसाठी पोलिस बंदोबस्त खर्च वगळून.)

५. प्राधिकरणाने निवडणूकी दरम्यान खरेदी केलेले निवडणूक साहित्य, लेखन साहित्य (Stationary) ई. च्या पुनर्वापराबाबत संदर्भ क्र.१३ अन्वये आदेश निर्गमित केलेले आहेत. त्यानुसार निवडणूक निर्णय अधिकारी यांनी जिल्हा / तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांचेकडे जमा होणाऱ्या आणि पुनर्वापर होणे योग्य असणाऱ्या स्टेशनरी / साहित्याचा प्राधान्याने वापर करावा. अशी स्टेशनरी उपलब्ध नसेल तरच ती खरेदी किंवा भाडेतत्वावर घ्यावी.

६. संबंधित जिल्हा / तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांनी सादर केलेल्या प्रपत्र १ ते २१, १ ते २८ आणि १ ते ३१ ची छाननी प्राधिकरण स्तरावर करण्यात येईल. छाननीत निवडणूक खर्च तपशिलाबाबत कोणत्याही त्रुटी / उणीवा आढळून आल्यास त्याबाबत संबंधित जिल्हा / तालुका सहकारी निवडणूक अधिकारी व निवडणूक निर्णय अधिकारी यांचा खुलासा मागवून पुढील यथोचित कार्यवाही करण्यात येईल.

७. कमाल निवडणूक निधी मर्यादेपेक्षा ज्यादा खर्च केल्यास त्याची जबाबदारी संबंधित निवडणूक निर्णय अधिका-यावर राहिल. विहीत कमाल मर्यादेपेक्षा अधिक झालेल्या खर्चास प्राधिकरणाने सहमती न दिल्यास, अमान्य रक्कम संबंधित संस्थेच्या निवडणूक खात्यात जमा करणे संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी व जिल्हा / तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांचेवर बंधनकारक राहिल.

८. जिल्हा /तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी / निवडणूक निर्णय अधिकारी / सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक कक्षातील कर्मचा-यांचे मानधन हे संस्थेच्या निवडणूक निधीचा हिशोब पूर्ण करुन सक्षम

प्राधिका-याकडून मान्य झाल्यानंतरच अदा करावे. तसेच संस्थेची प्रपत्र १ ते २१, १ ते २८ आणि प्रपत्र १ ते ३१ मधील माहिती मुदतीत सादर न केलेस, प्राधिकरणाने विहीत केलेल्या नोंदवहयांमध्ये निवडणूक निधीचे जमाखर्च अद्यावत न ठेवल्यास संबधित जिल्हा / तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी / निवडणूक निर्णय अधिकारी / सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक कक्षातील कर्मचा-यांचे मानधन वसुलीस पात्र राहिल.

९. निवडणूक निधी मर्यादेपेक्षा जादा झालेल्या खर्चाचे प्रस्ताव प्राधिकरणास मंजूरीस्तव सादर करताना – निवडणूक निर्णय अधिकारी यांनी प्रपत्र १ ते २१, १ ते २८, १ ते ३१ मधील संपुर्ण माहिती भरुन प्रस्तावासोबत जोडावी. निवडणूकीत झालेल्या खर्चाचे बाबवार व्हाउचर्स / बिले १ ते २८ चे क्रमानुसार सही – शिक्यानिशी सांक्षांकित करुन जोडावीत. मालाचा / वस्तुंचा पुरवठा करण्यासाठीचे कोटेशन, पुरवठा करणेबाबत आदेशाची प्रत, पुरवठा केलेल्या मालाची / वस्तुची पोहच पावती इ. अनुषंगीक कागदपत्रे आवश्यक तेथे सोबत जोडवीत. जिल्हा / तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांनी नि.नि.अ. यांचेकडुन प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन निवडणूक निधीची मर्यादा किती होती, किती निधी भरणा करण्यात आला, मर्यादेपेक्षा जादा वाढीव निधी भरणा करुन घेणे आगोदर प्राधिकरणाची पुर्व परवानगी घेतल्याचा तपशिल इ. ची माहिती नमुद करुन प्रस्तावावरील आपल्या स्वंयस्पष्ट अभिप्रायासह मर्यादेपेक्षा वाढीव खर्चाचा प्रस्ताव मंजूरीस्तव प्राधिकरणास निवडणूक निकालापासुन १ महिन्याच्या आत सादर करावा.

वरीलप्रमाणे नमूद केलेले खर्चाचे निकष या आदेशाच्या दिनांकापासून ज्या संस्थांचे मतदानासाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर होणार नाही त्या संस्थांचे निवडणूक खर्चासाठी लागू राहतील.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मान्यतेने.**

सोबत : प्रपत्र १ ते २१, १ ते २८ व १ ते ३१.

१६/०६/२०२०

(यशवंत गिरी)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रति,

१. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)
२. तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)
३. निवडणूक निर्णय अधिकारी (सर्व)

# -: प्रपत्र १ ते २१ :-

जिल्हा

तालुका/प्रभाग

| अ. क्र. | संस्थेचे नाव | बिनविरोध / | सभासद संख्या | | | कार्यक्षेत्र | | | | मतदान ठिकाणीची संख्या | त्याअंतर्गत मतदान केंद्राची संख्या | मतदान केंद्र कर्मचारी एकुण संख्या | मतमोजणी कर्मचारी एकुण संख्या | उमेदवारी अर्ज विक्रीतुन व उमेदवार ठेव प्राप्त रक्कम रू. | उमेदवार ठेव जप्त रक्कम रू. | संस्थेने जमा केलेला एकुण निवडणुक निधी रु |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | वैयक्तिक | संस्था सभासद | एकूण | तालुका | जिल्हा | विभाग | राज्य | | | | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ |
| | | | | | | | | | | | | | | उमेदवारी अर्ज विक्री रु. -<br><br>उमेदवार अनामत ठेव प्राप्त रु.- | | |

| निवडणूकीसाठी झालेला खर्च रक्कम | | | | |
|---|---|---|---|---|
| परस्पर संस्थेकडून झालेला खर्च | जिसनिअ स्तरावरील एकुण खर्च | निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडील प्राप्त निधीतुन झालेला खर्च | एकूण खर्च | शेरा |
| १८ | १९ | २० | २१ | |
| | | | | |

(नाव, पदनाम व स्वाक्षरा)
निवडणूक निणय आधकारा
दिनांक :

**अंदाजित खर्च तपशील / अंतीम खर्च तपशील**

**-: प्रपत्र १ ते २८ :-**

निनिअ नाव

पदनाम

| अ. क्रं. | तपशील | संख्या | दर | अंतीम खर्च (रु.) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | मतपत्रिका छपाई (संख्या) | | | | |
| | i. सर्वसाधारण | | | | |
| | ii. महिला | | | | |
| | iii. अ.जा./अ.ज. | | | | |
| | iv.वि.जा./विमा.प्र. | | | | |
| | v. इमाव. | | | | |
| | एकुण | | | | |
| २ | मतपेटी खरेदी (संख्या) | | | | |
| ३ | प्रत्यक्ष मतदान केद्रांवर लागणारी स्टंशनरी उदा.बाणफुलीचे शिक्के, कूलूप, लाख, लिफाफे, इंकपॅड, शाई, मतदान कक्ष साहीत्य इ. | | | | |
| ४ | बुथ संख्या/वाहन संख्या | | | | |
| ५ | मतदान केद्रं भाडे | | | | |
| ६ | मतदार केद्रं वीज/पाणी खर्च जनरेटर/बल्ब इ. | | | | |
| ७ | मतदान केद्रं कर्मचारी जेवण चहा,नाष्टा | | | | |
| ८ | मतदान केद्रं कर्मचारी मानधन (संख्या) | | | | |
| | i. मतदान केद्रांध्याक्ष - | | | | |
| | ii. मतदान अधिकारी - | | | | |
| | iii. शिपाई - | | | | |
| ९ | मतमोजणी वेळी लागणारे साहीत्य उदा.टेबल,खुर्ची भाडे. सुरक्षितता उपाययोजना साहीत्य खरेदी, स्पीकर इ. | | | | |
| १० | मतमोजणी केद्रं भाडे | | | | |
| ११ | मतमोजणी वेळी लागणारी स्टेशनरी उदा.ट्रे,रबर,बॅड,टोचा,जाहीरात बोर्ड इ. | | | | |
| १२ | मतमोजणी कर्मचारी जेवण,चहा,नाष्टा | | | | |
| १३ | मतमोजणी कर्मचारी मानधन | | | | |
| १४ | मतदान व मतमोजणी वेळेसचा पोलीस कर्मचारी मानधन | | | | |
| १५ | निवडणूक कार्यक्रम प्रसिध्दी, जाहीरात खर्च | | | | |
| १६ | उमेदवारी अर्ज छपाई व त्यावेळी लागणारी स्टेशनरी खरेदी | | | | |
| १७ | जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी मानधन | | | | |
| १८ | निवडणूक निर्णय अधिकारी मानधन | | | | |
| १९ | सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी मानधन | | | | |
| २० | व्हिडीओ पथक खर्च | | | | |
| २१ | कायदा/सुव्यवस्थेसाठी पोलीस बंदोबस्त खर्च | | | | |
| २२ | उमेदवार खर्च / आचार संहिता नियंत्रण कक्ष कर्मचारी मानधन | | | | |
| २३ | अंतीम मतदार यादी छपाई खर्च | | | | |
| २४ | निवडणूक निरीक्षक मानधन व भत्ते | | | | |
| २५ | जि.स.नि.अ. निवडणूक नियंत्रण कक्ष कर्मचारी मानधन | | | | |
| २६ | मतदान व मतमोजणी कर्मचारी प्रशिक्षण खर्च | | | | |
| २७ | पदाधिकारी निवडणूक अध्यासी अधिकारी मानधन | | | | |
| २८ | अ - अनुषंगिक किरकोळ खर्च | | | | |
| २८ | ब - कोवीड - १९ संदर्भात करावयाच्या उपाययोजनाबाबत | | | | |
| २९ | जिउनि स्तरावरील इतर खर्च | | | | |
| | **एकुण खर्च** | | | | |

निवडणूक दिनांक

संस्थेने जमा केलेला एकुण निवडणुक निधी

निनिअ यांना प्राप्त निधी

उमेदवार अर्ज विक्री जमा

(नाव, पदनाम व स्वाक्षरी)

निवडणूक निर्णय अधिकारी

दिनांक :

-: प्रपत्र १ ते ३१ :-

जिल्हा

तालुका/प्रभाग

| अक्र | संस्थेचे नांव | तालुका | संस्था प्रकार व निवडणुक नियमानुसार वर्ग अ,ब,क,ड | सभासद संख्या | | कार्यक्षेत्र | अंतिम यादी प्रसिध्दीचा दिनांक | निवडणुक निर्णय अधिकार्याचे नांव | पदनाम | मतदान दिनांक | ई-९/ई-१७ निकाल जाहीर दिनांक | संचालक मंडळ सदस्यांची संख्या एकुण पदे | निवडुन आलेली पद संख्या | निवडुन न आलेली पद संख्या | निवडणुक झाली/ बिनविरोध झाली |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | वैयक्तीक | संस्था | | | | | | | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ |
| | | | | | | | | | | | | | | | |

| कलम ७३ अअअ(५) प्रमाणे समिती गठीत झाली होय/नाही | अधिसुचना आदेशाचा दिनांक | पदाधिकारी निवड दिनांक | उमेदवारी अर्ज | | उमेदवार ठेव परत रक्कम रु. | संस्थने जमा केलेला एकुण निवडणुक निधी | निवडणुकीकरीता झालेला खर्च | | | उमेदवारांची ठेव अनामत परत केलेली रक्कम | अनामत जप्त केलेली रक्कम प्राधिकरणास वर्ग केल्याचा दिनांक | निवडणुक निर्णय अधिकारी यांनी निवडणुक खर्च सादर केलेला दिनांक | जिसनिअ न हिशोब पुर्ण करुन संस्थेस शिल्लक रक्कम परत केल्याचा दिनांक व परत केलेली रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अर्ज विक्री | अनामत ठेव प्राप्त | | | निनिअ यांचेकडील झालेला खर्च | जिसनिअ/ तासिअ खर्च | एकुण खर्च | | | | | |
| १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | ३१ |
| | | | | | | | | | | | | | | |